# लिंबू

**पिकाचे नाव:** लिंबू
**शास्त्रीय नाव:** सिट्रस लेमन
**कुळ:** रुटेसी
**लागवड अंतर:** 10×16 फुट
**जात:** फुले शरबती, कागजी लिंबू, बालाजी, साई शरबती
**लागवड क्षेत्र:** 19 R

**लिंबू झाडाचे चे गुणधर्म:** लिंबू (Lime and Lemon) उत्पादनात जागतिक स्थरावर भारत देश आघाडीवर आहे. देशात आंध्र प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र ही राज्य उत्पादनाच्या दृष्टीने अग्रेसर आहेत. लिंबू फळा मध्ये औषधी आणि पौष्टिक गुणधर्म असून लिंबू फळ हे व्हिटॅमिन 'सी' चा एक प्रमुख स्रोत आहे (65 मिली प्रति 100 ग्रॅम) आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते.
**माती:** चांगला निचरा होणारी हलकि ते मध्यम, काळी जमीन जिचा सामू 6.5 -7.5 एवढा असेल अशी जमीन लिंबू लागवडीसाठी निवडावी, चुनखडी युक्त जमीन लिंबू लागवडी साठी हानिकारक असते. जमिनीतील मुक्त चुन्याचे प्रमान 6-8% पेक्षा कमी असलेली तसेच विद्युत वाहकता (EC) 0.1% पेक्षा कमी असलेली जमीन लागवडी साठी निवडावी.
**तापमान:** लिंबू लागवडीसाठी उपोष्णकटिबंधीय (उष्ण व कोरडे) हवामान योग्य आहे, कमी तापमान व जास्त पाऊस हा लिंबू पिकासाठी अतिशय हानिकारक आहे. आवश्यक तापमान 20-38 C. आवश्यक पर्जन्यमान 75-200 cm.
**उत्पादन:** लिंबू बागेत उत्पादन सुरु होण्यास कमीत कमी 4-5 वर्षांचा कालावधी लागतो. लागवडीच्या चौथ्या वर्षी प्रती झाड साधारण 20 किलो पर्यंत एका वर्षातील दोन्ही बहारातील उत्पादन मिळू शकते. 10 वर्षानंतर, 6x6 मीटर लागवड अंतरावर साधारण 45-55 टन प्रति हेक्टर प्रति वर्षी एवढे उत्पादन मिळते.
**कीड:** नागआळी, लाल कोळी, खोड कीड, सिट्रस सायला.
**रोग:** सिट्रस कँकर (देवी, खैऱ्या रोग), सिट्रस ट्रीस्टेजा, डिंकया.



# लिंबू
## फुले शरबती

**जात:** फुले शरबती
**लागवड दिनांक:** 14/04/2024
**लागवड अंतर:** 10x16 फुट
**लागवड क्षेत्र:** 7.8 R
**रोपसंख्या:** 42

**फुले शरबती जातीची वैशिष्टे:** लवकर बहार येणारी खैऱ्या व ट्रीस्टेजा रोगास सहनशील तसेच इतर कीड व रोगास प्रतिकारक्षम जात. चांगली टिकवण क्षमता असल्याने लांब च्या वाहतुक करण्यासाठी चांगली आहे. गोलाकार आकाराची (50-55 ग्राम), फळे व पातळ साल. साई शरबती या वाना पेक्षा 11.3% अधिकम उत्पादन देणारी जात. महाराष्ट्रात लागवडी साठी योग वाण.

**उत्पादन:** उत्पादन सुरु होण्यास कमीत कमी 4-5 वर्षांचा कालावधी लागतो, लागवडीच्या चौथ्या वर्षी प्रती झाड साधारण 20 किलो पर्यंत एका वर्षातील दोन्ही बहारातील उत्पादन मिळू शकते. 10 वर्षानंतर, 6x 6 मीटर लागवड अंतरावर साधारण 52 -53 टन प्रति हेक्टर प्रति वर्षी एवढे उत्पादन निघू शकते.



# लिंबू
## बालाजी

**जात:** बालाजी
**लागवड दिनांक:** 22/11/2023
**लागवड अंतर:** 10x16 फुट
**लागवड क्षेत्र:** 2.6 R
**रोपसंख्या:** 18

**बालाजी जातीची वैशिष्टे:** मुळ भारतीय असलेली, मोठ्या आकाराची समोरच्या बाजूने निमुळती पिवळसर हिरव्या रंगाची फळे असणारी जात आहे. फळे रसाळ चविस गोड आहेत, हि जात खैऱ्या रोगास प्रतिकारक्षम आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणासाठी या राज्यांसाठी लागवड योग्य जात आहे.

**उत्पादन:** उत्पादन सुरु होण्यास कमीत कमी 4-5 वर्षांचा कालावधी लागतो, लागवडीच्या चौथ्या वर्षी प्रती झाड साधारण 20 किलो पर्यंत एका वर्षातील दोन्ही बहारातील उत्पादन मिळू शकते. 10 वर्षानंतर, 6x6 मीटर लागवड अंतरावर साधारण 55 टन प्रति हेक्टर प्रति वर्षी एवढे उत्पादन निघू शकते.



# लिंबू
## कागजी लिंबू

**जात:** कागजी लिंबू
**लागवड दिनांक:** 22/11/2023
**लागवड अंतर:** 10x16 फुट
**लागवड क्षेत्र:** 2.6 R
**रोपसंख्या:** 18

**कागजी लिंबू जातीची वैशिष्टे:** लहान ते मध्यम आकाराची पिवळसर हिरव्या सालीची जात आहे. ह्या जातीची फळे प्रामुख्याने प्रक्रिया करण्यासाठी वापरली जातात.

**उत्पादन:** उत्पादन सुरु होण्यास कमीत कमी 4-5 वर्षांचा कालावधी लागतो. 10 वर्षांनंतर, 6x6 मीटर लागवड अंतरावर साधारण 55 टन प्रति हेक्टर प्रति वर्षी एवढे उत्पादन निघू शकते.



# लिंबू
## साई शरबती

**जात:** साई शरबती
**लागवड दिनांक:** 28/07/2023
**लागवड अंतर:** 10x16 फुट
**लागवड क्षेत्र:** 7.05 R
**रोपसंख्या:** 48

**साई शरबती जातीची वैशिष्टे:** या जातीची फळे गुळगुळीत पातळ सालीची आणि एकसारखी मध्यम आकाराची (50 ग्रॅम) असतात. खैऱ्या रोगास सहनशील जात. चांगली टिकवण क्षमता असलेलली जात. रसाचे प्रमाण 54-55%.

**उत्पादन:** उत्पादन सुरु होण्यास कमीत कमी 4-5 वर्षांचा कालावधी लागतो, चौथ्या वर्षी प्रती झाड साधारण 20 किलो पर्यंत एका वर्षातील दोन्ही बहारातील उत्पादन मिळू शकते. 10 वर्षानंतर, 6x 6 मीटर लागवड अंतरावर साधारण 47 टन प्रति हेक्टर प्रति वर्षी एवढे उत्पादन निघू शकते.

